न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आमदार जगताप यांचा पुढाकार

**वाकड-हिंजवडी रस्त्यावरील वाहतूक कोंडी हा नागरिकांसाठी गंभीर विषय ठरला: आमदार शंकर जगताप यांनी प्रत्यक्ष पाहणी करून संभाव्य उपाययोजना ठरवल्या.**



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड हे महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे शहर असून, येथील वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण पडत आहे. या पार्श्वभूमीवर वाकड-हिंजवडी रस्त्यावरील वाहतूक कोंडी हा नागरिकांसाठी गंभीर विषय ठरला आहे. आमदार शंकर जगताप यांनी

पोलीस प्रशासन आणि महानगरपालिका अधिकारी यांच्यासमवेत प्रत्यक्ष पाहणी करून संभाव्य उपाययोजना ठरवल्या.

निवडणूक जाहीरनाम्यामध्ये वाहतूक व्यवस्थापनाबाबत मी आग्रही भूमिका घेणार असल्याचे नमूद केले होते. त्याच अनुषंगाने काल वाकड-हिंजवडी रस्त्यावरील ,कस्तुरी चौक ,काळा खडक चौक , विनोदे नगर , सोनेस्ट टॉवर चौक , श्रीराम चौक , भूमकर चौक येथे वाहतूक कोंडीची 'बॉटल नेक' परिस्थिती सोडविण्यासाठी नागरिकांसह , स्थानिक व्यापाऱ्यांशी संवाद साधत प्रत्यक्ष पाहणी करून उपाययोजना सुचवल्या, असे आमदार जगताप यांनी सांगितले.

शहराच्या वाहतुकीला जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी मल्टिलेव्हल इल्हीवेटर ब्रिज आणि अंडरपास निर्माणाचे प्रस्ताव तयार करण्यात येतील असा विश्वास त्यांनी नागरिकांना दिला.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी रस्ते रुंदीकरण, वाहतूक सिग्नल यंत्रणा सुधारणा आणि वाहतूक पोलिसांची तैनाती वाढविणे हे आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.काही महत्त्वाच्या रस्त्यांवर एकमार्गी वाहतूक यंत्रणा अमलात आणल्याने वाहतूक सुरळीत होईल तसेच योग्य नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे वाकड-हिंजवडी रस्त्यावरील वाहतूक कोंडी निश्चित सुटेल आणि आपल्या पिंपरी-चिंचवड शहराचा विकास अधिक वेगाने होईल. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी पोलीस उपायुक्त श्री.बांगर साहेब , शहर अभियंता श्री.निकम साहेब , पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्या प्रा.सौ.भारतीताई विनोदे , श्री.एस.पी.पिंजण साहेब , श्री.सुर्यवंशी साहेब ,प्रदेश सदस्य श्री.संतोष कलाटे, मा.नगरसेवक श्री. संदीप कस्पटे, मंडल अध्यक्ष श्री.प्रसाद कस्पटे , श्री.राम वाकडकर , श्री.संकेत चोंधे , श्री.श्रीनिवास कलाटे , श्री. सुरज भुजबळ, श्री.सुदेश राजे, सौ.तेजस्विनीताई ढोमसे, श्री.प्रमोद भुजबळ यांच्यासह महापालिका अधिकारी, सोसायटीचे सदस्य अणि परिसरातील नागरिक आदी उपस्थित होते.

## वाकड येथील 15 एकर जागा पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या ताब्यात

**वरिष्ठ अधिकारी निवासस्थाने, गुन्हे शाखेची कार्यालयांसह इतर सुविधा होणार**



**पिंपरी | प्रतिनिधी**

वाकड मधील पेठ क्रमांक ३९ येथील १५ जागा पीएमआरडीए कडून पिंपरी-चिंचवड पोलिसांना मिळाली. शुक्रवारी (दि. २७) या जागेचा आगाऊ ताबा पोलिसांना मिळाला आहे. एक वर्ष आठ महिने एवढ्या कमी कालावधीत जागेबाबत पाठपुरावा करून जागा मिळवण्यात आयुक्त विनयकुमार चौबे यांना यश आले आहे.

पिपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची स्थापना ६ वर्षांपूर्वी झाली. तरी देखील पिंपरी चिंचवड आयुक्त कार्यालय, पोलीस अधिकारी यांची निवासस्थाने, पोलीस विभागाचे मुख्यालय व इतर अनुषंगीक कार्यालये यांना स्वतंत्र जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रशासकिय कामकाज करणे व कामकाज सुरळीतपणे चालविण्यामध्ये खुप मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होत होत्या. आयुक्त विनयकुमार चौबे यांनी डिसेबर २०२२ मध्ये पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर ही बाब विचारात घेऊन आयुक्तालयासाठी अत्यावश्यक असणाऱ्या जागा प्राप्त करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जागांचा शोध सुरु झाला.

पीएमआरडीएच्या ताब्यात असणाऱ्या वाकड येथील पेठ क्रमांक ३९ येथे मोकळी जागा असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यातील १५ एकर जागा मिळण्यासाठी पोलीस आयुक्तांनी पीएमआरडीएकडे प्रस्ताव पाठवला. पीएमआरडीएने हा प्रस्ताव राज्याच्या नगर विकास विभागाकडे पाठवला. तिथे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी व्यक्तिशः पाठपुरावा करून जागा मिळवण्यासाठी प्रयत्न केले.

## ...त्या 17 कर्मचा-यांना त्वरीत कामावर घ्या

**सहायक आयुक्तांचे ठेकेदाराला आदेश**



**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील विविध स्मशानभूमी येथे देखभाल व सुरक्षेचे काम करणाया सर्व कर्मचा-यांना तत्काळ कामावर रुजू करुन घेण्याचे न्यायालयाने पालिकेला आदेश दिले. तरी, ठेकेदाराकडून १७ कर्मचा-यांना परत कामावर घेण्यास नकार दिला जात आहे. त्यामुळे मनसेचे सचिव रुपेश पटेकर यांच्या मध्यस्तीनंतर आरोग्य विभागातील प्रशासनाने त्वरीत आदेश काढून त्या सतरा कर्मचा-यांना कामावर रुजू करुन घेण्याच्या सूचना संबंधित ठेकेदाराला दिल्या.

पिंपरी-चिंचवड महापालिका अंतर्गत शहरातील विविध स्मशानभूमीची देखभाल आणि तेथील सुरक्षा ठेवण्याचे काम काही कंत्राटदार संस्थांना देण्यात आले आहे. काही कारणास्तव तेथे काम करणा-या काही कर्मचा-यांना संबंधित संस्थांनी कामावरुन अचानक कमी केले.

संस्थेकडून अन्याय झाल्याने सर्व कार्मचा-यांनी न्याय मिळवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली. त्यावर या सर्व कर्मचा-यांना त्वरीत कामावर घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले. तरी देखील संबंधित ठेकेदारांकडून कर्मचा-यांना कामावर रुजू करुन घेण्यास विरोध केला जातो. अनेकवेळा दाद मागूनही न्याय मिळत नसल्यामुळे कार्मचा-यांनी मनसेकडे दाद मागितली.

मनसेचे सचिव रुपेश पटेकर यांनी त्या कर्मचा-यांसह आरोग्य विभागात जाऊन प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली. त्यावर सहायक आयुक्त अजिंक्य येळे यांनी त्वरीत आदेश काढत संबंधित १७ कर्मचा-यांना कामावर तत्काळ रुजू करुन घेण्यात यावे, अशा सूचना संबंधित ठिकेदाराला दिल्या. अन्यथा आपल्यावर कारवाई करण्यात येईल, अशी तंबी देखील त्यांनी दिली. त्यामुळे पटेकर यांच्या पाठपुराव्याला यश आल्याने सर्व कर्मचा-यांमध्ये आनंदी वातावरण आहे.

# पीएमपीएमएलकडून विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रमासाठी जादा बसेसचे नियोजन

## येत्या 1 जानेवारीला कोरेगाव-भिमा दरवर्षीप्रमाणे विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रम पार पडणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपीएमएल) कोरेगाव-भिमा येथील विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रमासाठी विशेष बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या १ जानेवारीला कोरेगाव-भिमा दरवर्षीप्रमाणे विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पीएमपीएमएलकडून विशेष बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. कोरेगांव-भिमा येथे विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी राज्यातून तसेच पुणे व पिंपरी चिंचवड शहर व ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात भीमअनुयायी उपस्थित राहत असतात. त्यांच्या सोयीसाठी तसेच येणारी वाढीव प्रवासी संख्या विचारात घेवून पीएमपीएमएलने ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी या दोन्ही दिवशी जादा बसेसचे नियोजन केले आहे.

पीएमपीएमएलने खाली दिलेल्या ठिकाणांवरून भिमा कोरेगांव विजयस्तंभापर्यंत मोफत बससेवा असणार असल्याचे जाहीर केले आहे. दरम्यान, इतर मार्गांच्या बसेसने प्रवाशांनी या पार्किंगपर्यंत तिकीट घेऊन प्रवास करावा असे आवाहन पीएमपीएमएलकडून करण्यात आले

यासोबतच पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील विविध स्थानकांवरून प्रवास भाडे आकारणी करून लोणीकंद कुस्ती मैदानपर्यंत जादा बसेसचे नियोजन देखील करण्यात आले आहे.

तसेच १ जानेवारी रोजी कोरेगाव-भिमा येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्याकरिता येणाऱ्या अनुयायांची पुणेस्टेशन, ससून रोड व मोलेडीना बसस्थानकावर प्रचंड गर्दी होत असते. त्यामुळे ससून रोड व मोलेडीना बसस्थानकावरून सुटणारे सर्व बसमार्ग सकाळपाळीत पुणेस्टेशन डेपो बसस्थानकातून संचलनात राहणार आहेत. तसेच पुलगेटकडून येरवडा, आळंदी कडे जाणारे बसमार्ग जी.पी.ओ., पुणेस्टेशन डेपो, अलंकार टॉकीज मार्गे संचलनात राहतील. मात्र हे बदल फक्त सकाळ पाळीमध्येच करण्यात आलेले आहे.



### शिक्रापूर विभाग

» ३१ डिसेंबरला सकाळी ७ वाजेपासून शिक्रापूर रोड, जीत पार्किंग, वक्फ बोर्ड, नगर रस्ता, पिंपळे जगताप पार्किंग, चाकण रोड, ते भिमा कोरेगांव विजयस्तंभ पर्यंत १४० बसेस आणि वढू पार्किंग इनामदार हॉस्पिटल ते वढू पर्यंत १० बसेस अशा एकूण १५० मोफत (विनातिकिट) बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

» १ जानेवारीला पहाटे ४ ते रात्री १२ पर्यंत शिक्रापूर रोड, जीत पार्किंग, वक्फ बोर्ड, पिंपळे जगताप पार्किंग, चाकण रोड येथून ३५० बसेस व वढू पार्किंग इनामदार हॉस्पिटल ते वढू पर्यंत ३० बसेस अशा एकूण ३८० मोफत (विनातिकिट) बसेसचे नियोजन करण्यात आले आहे..

### लोणीकंद विभाग

» ३१ डिसेंबरला दुपारी चार ते पहाटे चार पर्यंत तुळापूर फाटा, लोणीकंद कुस्ती मैदान, खंडोबा माळ, चिंचबन, फुलगाव शाळा व पेरणे गाव ७५ मोफत (विनातिकिट) बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

» १ जानेवारीला पहाटे चार ते रात्री १२ वाजेपर्यंत तुळापूर फाटा, चिंचबन, लोणीकंद कुस्ती मैदान, खंडोबा माळ, फुलगाव शाळा, पेरणे गाव येथून पेरणे टोल नाका पर्यंत २५० मोफत (विनातिकिट) बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

# मद्य प्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर पुणे पोलीस उगारणार कारवाईचा दंडूका

## 31 डिसेंबरच्या दिवशी विशेष तपासणी मोहिम 30 ठिकाणी राबविणार

**पुणे | प्रतिनिधी**

दोन दिवसांवर ३१ डिसेंबर येऊन ठेपलेला आहे. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नववर्षाच्या स्वागतासाठी अनेकांकडून पार्टीचे प्लॅन सुरू आहेत. यात प्रामुख्याने डीजे नाईट आदी गोष्टी तरुणाईकडून करण्यात येतात. मात्र, बऱ्याचवेळा नववर्षाच्या स्वागत करत असताना अनेकांकडून पोलिसांनी घालून दिलेल्या नियामांची पालमल्ली करण्यात येते.




या दिवशी अनेकजण मद्य प्राशन करीत असतात. यामुळे या दिवसाच्या अनुषंगाने पुणे पोलीस सज्ज झाले असून वाहतूक शाखेकडून डिस्पोजेबल पाईपच्या माध्यमातून ब्रेथ ॲनलायझरच्या मदतीने ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह विरोधात ३० ठिकाणी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

लोकसभेपाठोपाठ विधानसभेची निवडणूक झाली. या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पुणे पोलिसांनी विशेष मोहिम राबविली होती. या काळात मद्यप्राशन वाहने चालवणाऱ्यांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली होती. १ जानेवारी ते २७ डिसेंबर या काळात ५,२५६ मद्य प्राशन करून वाहने चालवणाऱ्यांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

लॉकडाऊनच्या काळात ब्रेथ ॲनलायझर तपासणीची मोहिम बंद करण्यात आली होती. डिसेंबर २०२३ मध्ये पुन्हा एकदा या मोहिमेची सुरूवात करण्यात आली. ३१ डिसेंबर या दिवशी अनेकांकडून नियमांचे उल्लघन करण्यात येते असते. यामुळे आता बंद असलेली ब्रेथ ॲनलायझर तपासणीची विशेष मोहिम पुणे पोलिसांना सुरू राहणार आहे. प्रामुख्याने डीजे नाईट आदी गोष्टी तरुणाईकडून करण्यात येतात. मात्र, बऱ्याचवेळा नववर्षाच्या स्वागत करत असताना अनेकांकडून पोलिसांनी घालून दिलेल्या नियामांची पालमल्ली करण्यात येते.

# पाण्याच्या टँकरचा रंग बदलणार, पुणे महापालिकेचा मोठा निर्णय !

## महापालिकेकडून शहरातील बांधकामांना सांडपाण्यावर प्रक्रिया केलेले पाणी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहरातील बांधकामांना सांडपाण्यावर प्रक्रिया केलेले (एसटीपीचे) पाणी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठीचे टँकर नागरिकांच्या लक्षात यावेत, या उद्देशातून सर्व टँकरला हिरवा रंग अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच या टँकरवर पिण्याचे नाही तर एसटीपीचे पाणी असे लिहिणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या टँकरला हिरवा रंग असेल त्यांनाच पाणी द्यावे, असे आदेश देण्यात आले असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले.



खराडी येथील न्याती एलिसीया सोसायटीला खासगी टँकर पुरवठादाराकडून महापालिकेच्या एसटीपीचे पाणी पिण्यासाठी पुरविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. ठेकेदारांनी एसटीपीच्या पाण्याचे टँकर वेगळे ठेवण्याचे आदेश दिल्यानंतरही सोसायटीला अशा प्रकारे पाणी दिल्याचे समोर आल्यानंतर खडबडून जागे झालेल्या महापालिकेने एसटीपी पाण्याच्या टँकरला हिरवा रंग देणे बंधनकारक केले आहे. हिरव्या रंगाचे टँकर असतील तरच त्यांना एसटीपीचे पाणी द्यावे, अशा सूचना देण्यात आल्या असून या निर्णयाची माहिती शहरातील सर्व सोसायट्यांनाही दिली जाणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले.

खराडी येथील सोसायटीला चक्क एसटीपीचे पाणी दिले जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित ठेकेदाराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी कोणती कलमे लावणे अपेक्षित आहे, अशी विचारणा पोलिसांनी शुक्रवारी महापालिकेकडे केली आहे. याबाबत महापालिकेच्या विधी विभागाकडून सार्वजनिक आरोग्यास धोका पोहोचविण्यासह इतर काही कलमांची माहिती खराडी पोलिसांना कळविण्यात आली आहे. त्यानुसार, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

# 15 वर्षे रखडलेल्या रस्त्याचे काम सुरु

## 250 मीटरचा रस्ता ताब्यात न आल्याने पूर्ण क्षमतेने वाहतूक रहदारी सुरू होणार नसल्याचे चित्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

तब्बल 15 वर्षांनंतर, स्पाईन रस्त्यावरील तळवडे परिसरातील त्रिवेणीनगर चौकाजवळची 550 मीटर जागा ताब्यात आल्याने महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून तेथील रस्ता तयार करण्यातील मोठा अडसर दूर झाला आहे. रखडलेले काम सुरू झाले आहे; मात्र अद्यापि तेथील 250 मीटरचा रस्ता ताब्यात न आल्याने पूर्ण क्षमतेने वाहतूक रहदारी सुरू होणार नसल्याचे चित्र आहे.



पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने स्पाईन रस्ता विकसित केलेल्या कामास 15 वर्षे झाली आहेत. मात्र, त्रिवेणीनगर चौकातील जागा ताब्यात न आल्याने वाहतुकीच्या प्रचंड कोंडीचा सामना वाहनचालकांना दररोज करावा लागत आहे. त्यामुळे लहान-मोठे अपघात घडले आहेत. या कोंडीमुळे वाहनचालकांसह तेथे वावर करणारे नागरिकही वैतागले आहेत.

स्पाईन रस्ता 75 मीटर रूंद आहे. या रस्ता बाधित कुटुंबांना मोशी, प्राधिकरणाची जागा विकत घेऊन प्रत्येकी एक गुंठा जागा देण्याचा विशेष ठराव महापालिकेने मंजूर केला आहे. त्यासाठी महापालिकेने सेक्टर क्रमांक 11 येथे 14 हजार 754 चौरस मीटर जागा, 16 कोटी 52 लाख 11 हजार 200 रूपये देऊन खरेदी केली. सन 2012 पासून अद्याप 132 बाधितांना त्या जागेचे वाटप झाले नसल्याने, त्रिवेणीनगर चौकाजवळील जागा महापालिकेच्या ताब्यात अद्यापि आलेली नाही.

जागा ताब्यात घेण्यासाठी नगर रचना विभागाकडून धीम्यागतीने कामकाज सुरू आहे. आतापर्यंत दस्त तसेच, नोंदणी न झाल्याने ही जागा ताब्यात येण्याची प्रक्रिया रखडली आहे. काही बाधितांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने दस्त नोंद झालेले नाहीत. रस्ता तब्बल 15 वर्षांपासून रखडला असून, अर्धवट स्थितीत आहे. त्यामुळे त्या चौकात वाहतूक कोंडीची समस्या नित्याची झाली आहे. कोंडीमुळे वाहनचालकांची प्रचंड गैरसोय होत आहे.

अखेर, एकूण बाधित क्षेत्रापैकी 550 मीटर जागा तीन महिन्यांपूर्वी महापालिकेच्या ताब्यात आली. त्या ठिकाणी स्थापत्य विभागाकडून रस्ता बनविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. ते काम 50 टक्के पूर्ण झाले आहे. मंजूर विकास आराखडयानुसार हा रस्ता 75 मीटर रुंदीचा आहे. संपूर्ण जागा ताब्यात न आल्याने सध्या 37 मीटर रुंदीचा रस्ता विकसित करण्यात येत आहे. त्यामध्ये 12 मीटर रुंदीच्या दोन लेन, मध्यभागी 9 मीटर रुंदीचा एचसीएमटीआर (रिंग रोड) आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूस 2 मीटर रुंदीचे पेव्ह शोल्डर असे या रस्त्याचे नियोजन आहे. सध्या दुहेरी मार्गाचे 270 मीटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

### अद्याप 250 मीटरची जागा ताब्यात नाही

» **महापालिकेच्या नगर रचना विभागाच्या कासव गती कारभारामुळे त्रिवेणीनगर चौकातील अद्याप 250 मीटरची जागा महापालिकेच्या ताब्यात आलेली नाही. त्यामुळे 550 मीटरचे काम होऊनही पूर्ण क्षमतेने रस्त्यावरून वाहतूक रहदारी सुरू करता येणार नाही. जागा ताब्यात घेण्यास विलंब होत असल्याने स्थापत्य आणि नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये एका बैठकीत खडाजंगी झाल्याचे सुत्रांनी सांगितले. तातडीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश आयुक्तांनी नगर रचना विभागास दिले आहेत.**

### पूर्ण रस्ता झाल्यास नाशिक महामार्गाकडे जाणे होणार सुलभ

निगडी येथील भक्ती शक्ती समूह शिल्प चौकातून पुणे-नाशिक आणि पुणे-मुंबई जुन्या महामार्गाला जोडणाऱ्या त्रिवेनीनगरमधील रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर शहरात मुख्य रस्त्यांवरील अवजड वाहनांची संख्या कमी होणार आहे. वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवाशांच्या वेळेची व इंधनाची बचत होणार आहे. हा रस्ता तळवडे संगणकीय औद्योगिक केंद्र मार्गे चाकण एमआयडीसीला जोडण्यात महत्वाचा दुवा म्हणून काम करणार आहे. तसेच, या भागातील ड्रेनेज सुविधा, पावसाळी पाण्याचा निचरा याबाबत निर्माण होणाऱ्या समस्या मार्गी लागणार आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# भामा आसखेड योजनेतील जलवाहिनीच्या कामाला वेग

## काम पूर्ण झाल्यानंतर शहराला 167 एमएलडी पाणी उपलब्ध होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या भामा-आसखेड धरण पाणी योजनेतील भूमिगत जलवाहिनीच्या कामाची चार वर्षांची मुदत संपली आहे. केवळ 50 टक्के काम झाल्यामुळे महापालिकेने संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावली. नोटीस मिळाल्यानंतर ठेकेदाराने कामास गती दिली आहे. ते काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदाराला एका वर्षाची मुदतवाढ देण्यात येणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर शहराला 167 एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला मावळ तालुक्यातील पवना धरणातून पाणीपुरवठा केला जात आहे. दररोज 510 एमएलडी पाणी पवना नदीतील रावेत बंधारा येथून उचलले जात आहे. 'एमआयडीसी' कडून 20 एमएलडी पाणी घेतले जात आहे. आंद्रा धरणातून तात्पुरत्या स्वरूपात इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यावरून 80 एमएलडी पाणी उचलले जात आहे. 25 नोव्हेंबर 2019 पासून म्हणजे गेल्या पाच वर्षांपासून शहराला दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. असे असले तरी, शहरातील काही भागांत पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी कायम आहेत.



काम मुदतीमध्ये पूर्ण होत नसल्याने पाणीपुरवठा विभागाने संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत आयुक्तांकडे शिफारस केली होती. तसेच, नोटीसही बजावण्यात आली होती. त्यानंतर आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी ठेकेदारासमवेत तब्बल चार बैठका घेतल्या. त्यानंतर ठेकेदाराकडून पुढील काळात कशा प्रकारे जलदगतीने काम होईल, याचा कृती आराखडा तयार करून घेण्यात आला. नोटीस मिळाल्याने ऑफशोअर इंडियाने जलवाहिनीच्या कामाला गती दिली आहे. तसेच, जलवाहिनीच्या कामासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येणार आहे.

शहराची मागणी लक्षात घेऊन मावळ तालुक्यातील आंद्रा धरणातून 100 एमएलडी आणि खेड तालुक्यातील भामा-आसखेड धरणातून 167 एमएलडी पाणी आणण्यात येणार आहे. खेड तालुक्यातील वाकीतर्फे वाडा येथील अशुद्ध जलउपसा केंद्रापासून तळेगाव दाभाडे एमआयडीसीतील नवलाख उंब—े येथील ब—ेक प्रेशर टँकपर्यंत 7.30 किलोमीटर अंतर 1700 मिलीमीटर व्यासाची रायझिंग मुख्य जलवाहिनी टाकण्यात येत आहे. ब—ेक प्रेशर टँकपासून चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी नेण्यासाठी 18.80 किलोमीटर अंतर 1400 मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येत आहे. जलवाहिनी टाकण्यासाठी महापलिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सन 2020 मध्ये निविदाप्रक्रिया राबविली होती. ते काम ऑफशोअर इंडिया लिमिटेड या ठेकेदाराला 15 डिसेंबर 2020 ला देण्यात आले. त्यासाठी 162 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

# पुणे शहरातील सांडपाणी थेट नद्यांत!

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे महापालिकेला नोटीस बजावली

**पुणे | प्रतिनिधी**

सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते थेट नदीत सोडल्यामुळे जलप्रदूषण होऊन माशांचा मृत्यू झाल्याचा ठपका ठेवून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे महापालिकेला नोटीस बजावली आहे. महापालिकेचे शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प मंडळाची मंजुरी न घेता सुरू असल्याचेही उघडकीस आले आहे. महापालिकेचा नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि नदी परिसराची मंडळाच्या आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. त्या वेळी नदीच्या दोन्ही बाजूंना मृत मासे आढळून आले. याचबरोबर नदीसुधार योजनेची अंमलबजावणी सुरू असलेल्या ठिकाणी पाणी वाहते नसल्याचे निदर्शनास आले. 'नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या नजीक तीन नाल्यांमधून येणारे सांडपाणी थेट नदीत मिसळत आहे. यामुळे



नदीतील माशांचा मृत्यू झाला आहे. नाल्यातील सांडपाणी काळ्या रंगाचे, दुर्गंधीयुक्त असून, त्याचे पीएच मूल्य ६ ते ७ आहे,' असे नोटिशीत म्हटले आहे.

'महापालिकेकडून रोज ९० एमएलडी (दशलक्ष लिटर प्रतिदिन) सांडपाणी प्रक्रिया न करता थेट मुळा आणि मुठा नदीत सोडले जात आहे. याचबरोबर जुना नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पाडण्यात आला असला, तरी नवीन प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण झाले नसून, तो सुरू झालेला नाही. या प्रकल्पाला अजून वीज पुरवठ्याची पर्यायी सोय करण्यात आलेली नाही. महापालिकेचे शहरात विविध ठिकाणी ५६७ एमएलडी क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प असून, ते मंडळाच्या मंजुरीविना सुरू आहेत. या प्रकल्पांच्या मंजुरीची मुदत ३१ डिसेंबर २०२३ रोजी संपली आहे,' असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

**इंद्रायणी, उल्हास नद्यांसाठीही पालिका जबाबदार?**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला पाठविलेल्या नोटिशीत मुळा आणि मुठासोबत इंद्रायणी आणि उल्हास या नद्यांचीही उल्लेख केला आहे. वास्तविक इंद्रायणी आणि उल्हास नद्या पुणे शहरातून वाहत नसतानाही त्यांच्या प्रदूषणासाठी मंडळाने महापालिकेला जबाबदार धरले आहे. मंडळाकडून नजरचुकीने हा उल्लेख झाला, की अन्य काही कारण आहे, याबाबत अधिकाऱ्यांनी मौन धारण केले आहे.

> जलप्रदूषण केल्याप्रकरणी पुणे महापालिकेला नोटीस बजाविण्यात आली असून, नियमांची पूर्तता करून १५ दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. शहरातील १०० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठीच्या दीर्घकालीन उपाययोजनांचा आराखडा सादर करण्याची सूचनाही महापालिकेला केली आहे. महापालिकेने नोटिशीला उत्तर न दिल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.
>
> **- जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.**

> शहरातील सर्व सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याएवढ्या क्षमतेचे सांडपाणी प्रकल्प महापालिकेकडे नाहीत. याचबरोबर नवीन नायडू सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे काम सुरू असल्याने तो अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यरत झालेला नाही. शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची मंजुरी घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.
>
> **- मनीषा शेकटकर, प्रभारी मुख्य अभियंता, विद्युत विभाग, पुणे महापालिका.**

# कात्रज-कोंढवा रस्त्याचा भूसंपादनाचा खर्च 400 कोटींनी वाढला

## केवळ 18 हजार 250 चौरस मीटर जागा तडजोडीने ताब्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील बहुचर्चित कात्रज-कोंढवा रस्त्याचे रुंदीकरण रखडले आहे. या रस्त्याच्या भूसंपादनासाठी २०१७ मध्ये ७१५ कोटींचा गरज होती; पण आता हा खर्च १ हजार १०० कोटींवर गेला आहे. त्यामुळे सात वर्षांत भूसंपादनाचा खर्च ४०० कोटींनी वाढला आहे. गेल्या सात वर्षांत महापालिकेने तडजोडीने केवळ ६ टक्के जागा म्हणजे केवळ १८ हजार २५० चौरस मीटर जागा तडजोडीने ताब्यात आली आहे.



कात्रज-कोंढवा ८४ मीटरचा डीपी रोड आहे. या कामाला ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी मान्यता दिली आहे. हा रस्ता राजस सोसायटी ते खडी मशीन चौक ते महापालिका हद्दीत पिसोळीपर्यंत आहे. महापालिकेने २०१८ मध्ये कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाचे भूमिपूजन केले. हे काम २०२१ मध्ये पूर्ण होणे आवश्यक होते. आता सहा वर्षे झाली, तरीही भूसंपादनाअभावी काम रेंगाळले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही रस्त्याचे काम सलग न झाल्याने नागरिकांना या रस्त्याचा फारसा फायदा होत नाही. भूसंपादनामुळे पांढरा हत्ती ठरलेल्या कात्रज-कोंढवा रस्त्याची अखेर रुंदी कमी करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

पूर्वीच्या ८४ ऐवजी आता ५० मीटर रुंदीचा हा रस्ता निश्चित केला होता. त्यानुसार भूसंपादनासाठी शासनाकडे २८० कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी ५० टक्के रक्कम म्हणजे १३९ कोटी रुपये दिले आहेत. ही रक्कम येऊन अनेक महिने झाले तरीही अजून जागा ताब्यात आलेल्या नाहीत. गेल्याच आठवड्यात महापालिकेत झालेल्या बैठकीत ५० मीटरऐवजी संपूर्ण ८४ मीटरचा रस्ता करण्याचा निर्णय घेण्यात आला. भूसंपादनासाठी शासनाकडे ४०० कोटी रुपये मागितले जाणार आहेत.

आणखी २ लाख ७५ हजार ५०० चौरस मीटर जागेची आवश्यकता आहे. महापालिकेकडे सध्या शासनाने दिलेले १३९ कोटी आणि महापालिकेने केलेली तरतूद ७२ कोटी अशी २११ कोटींची तरतूद सध्या उपलब्ध आहे. भूसंपादन करण्यासाठी अजून ८८३ कोटी रुपयांची गरज आहे. त्यातील ५० टक्के निधी शासनाने द्यावा, अशी मागणी केली आहे.

नागरिकांनी टीडीआर, एफएसआय घ्यावा, यासाठी प्रयत्न केला जातो; पण त्यासाठी महापालिकेची प्रक्रिया ही अतिशय किचकट आहे; तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून सहकार्य केले जात नाही. प्रत्येक विभागात फाइल थांबवली जाते. त्रुटी काढल्या जातात, अडवणूक केली जात असल्याने जागामालक त्रासाने हैराण होतात. तसेच अनेकजण जमीनदार नसल्याने त्यांना टीडीआर व एफएसआय घेऊन करायचे काय, असा प्रश्न पडतो. त्यामुळेच महापालिकेकडून थेट रोख रक्कम घेण्यावर भर आहे. त्यामुळे भूसंपादनचा खर्च वाढला आहे.